# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनीयम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

विशेष मागासवर्ग कक्ष

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ फोन नं. ०७१३२ - २१६५९६

जावक क्रमांक : गो.वि./वि.मा.क.१०७८/२०२६ दिनांक १४/०८/२०२६

## परिपत्रक

**विषय:- विद्यापीठाशी संलग्नित विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित संस्थाच्या सरळसेवा बिंदूनामावलीची अंतिम तपासणी करण्याबाबत.**

संदर्भ:- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन अधिसुचना दिनांक-०७/०४/२०२२

२) शासन पत्र क्रमांक संकीर्ण २२०५/प्र.क्र.९८/विशि-१दि. २४/०६/२०२२

३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२६/ई. ९२६६६८/विशि-१ दिनांक- १७.०६.२०२६

४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२६/ई. १७९१२१५/विशि-१ दिनांक-०६ ऑगष्ट२०२६

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०७ एप्रिल २०२२ रोजीच्या अधिसुचनेमध्ये "महाराष्ट्र शैक्षणिक संस्था **(अध्यापक संवर्गातील आरक्षण)** अधिनियम, २०२१" अधिसुचित करण्यात आला आहे. तसेच, सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत शासनाच्या दिनांक २४ जून, २०२२ रोजीच्या पत्रांन्वये स्पष्टीकरण देखिल निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील पदांना आरक्षण धोरण लागु नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. असे असले तरी, काही **विनाअनुदानित / कायम अनुदानित संस्था/महाविद्यालयांकडुन** बिंदूनामावली प्रस्तावित करण्यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाले. त्याअनुषंगाने विधी व न्याय विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांचे अभिप्राय घेण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र. ३ नुसार संवर्गनिहाय आरक्षण ज्या संस्थाना राज्य शासनाकडुन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळते अशा शैक्षणिक संस्थाना लागु असल्याने विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित सर्व संस्थाना सदर आरक्षण धोरणातील तरतुदी लागु होणार नाहित" असे नमूद आहे.

परंतु संदर्भ क्र. ४ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन दिलेल्या सुचनाबाबत मा. महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय घेण्यात येत आहेत. सद्यस्थितीत शासनाचे संदर्भाधिन दिनांक १७.०६.२०२६ चे **पत्राद्वारे स्थगित** करण्यात येत आहे.

वरिल उपरोक्त संदर्भ क्र. ३ व ४ नमूद बाबीचा विचार करता गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांच्या शिक्षक संवर्गाच्या **संवर्गनिहाय** बिंदू नामावल्यांची **प्राथमिक** तपासणी विद्यापीठ स्तरावर करण्यात येईल तसेच **मा. सहाय्यक आयुक्त,** मावक नागपूर विभाग नागपूर यांचेकडून अंतिम तपासणी करण्यात यावी याची कृपया नोंद घ्यावी.

( डॉ. अनिल हिरेखण )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस सविनय सादर -**

१. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
२ मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
३.मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीट,गडचिरोली

Scanned with OKEN Scanner